२. वरीलप्रमाणे वाढीव दरडोई खर्चाच्या निकषात न बसणा-या योजना शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात याव्यात. शासनाच्या मान्यतेसाठी योजनांचे प्रस्ताव सादर करताना, त्यांना ज्या अधिका-यांनी तांत्रिक मान्यता दिली असेल त्यांच्या मार्फतच सविस्तर प्रस्ताव अभिप्रायासह शासनास सादर करण्यात यावेत.

३. सदर शासन निर्णयानुसार दरडोई खर्चाचे निकष शिथिल केलेल्या प्रस्तावांचा तपशील सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांनी, प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत, संचालक, पाणी स्वच्छता व सहाय संस्था, नवी मुंबई यांना न चूकता सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेब-साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२०८१३१५२४३५१८०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शैला ए.)
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
विधीमंडळ सदस्य, (सर्व)
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र - १, मुंबई (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र - २, नागपूर (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा,नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७

ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी प्रचलित दरडोई खर्चाचे निकष ३० ते ५० टक्केपर्यंत शिथिल करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देणेबाबत..

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय, क्रमांक ग्रापाथो-११०८/प्र.क्र.०५२/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक : १३ ऑगस्ट ,२०१२**

**वाचा:-** १) शा.नि.पापुवस्ववि. क्र. ग्रापापु १०९५/ सीआर ११२४ /पापु-०७, दि.१८ मे, १९९६.

**प्रस्तावना :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्यात ग्रामीण भागात नळ पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. या योजनांसाठी दरडोई खर्चाचे निकष शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये निश्चित केलेले आहेत. हे निकष त्यावेळच्या दरसुचीवर आधारित होते. त्याचप्रमाणे, योजनेचा उद्भव लांब असणे, योजनेसाठी दोन टप्प्यावर पाणी उचलावे लागणे, इत्यादी कारणांमुळे, या शासन निर्णयातील तरतूदीनुसार योजना तयार करणे शक्य होत नाही, त्यामुळे दरडोई खर्चाच्या निकषामध्ये वाढ करण्याच्या सुचना क्षेत्रीय स्तरावरून प्राप्त होत आहेत.

उपरोक्त परिस्थितीमुळे, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय मंजूरी प्रक्रियेमध्ये येणा-या अडचणी विचारात घेता, दरडोई खर्चाचे निकष काही प्रमाणात शिथिल अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीकोनातून, ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या प्रशासकीय मंजूरी प्रक्रियेमध्ये निर्माण होणारी उपरोक्त अडचण विचारात घेऊन, दि.१८ मे, १९९६ च्या शासन निर्णयामध्ये विहित केलेल्या दरडोई खर्चाचे निकष हे नवीन प्रस्तावांसाठी खालील प्रमाणे शिथिल करण्याचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| क्षेत्र | दरडोई खर्चाची प्रचलित मर्यादा | बिगर पाणी गुणवत्ता बाधित गावांमध्ये ३०% प्रमाणे | पाणी गुणवत्ता बाधित गावांमध्ये ५०% प्रमाणे |
|---|---|---|---|
| कोकण वगळून राज्याच्या इतर भागासाठी | | | |
| १) निर्देशित डोंगरी भाग | रू. २१२० | रू. २७५६ | रु.३१८० |
| २) ३० मी. पेक्षा जास्त Static lift असलेल्या नळ योजना | रू. १७९० | रू. २३२७ | रु.२६८५ |
| ३) ३० मी. पर्यंत Static lift असलेल्या नळ योजना | रू. १३९० | रू. १८०७ | रु.२०८५ |
| कोकण क्षेत्रासाठी | | | |
| १) निर्देशित डोंगरी भाग | रू. २३३० | रू. ३०२९ | रु.३४९५ |
| २) ३० मी. पेक्षा जास्त Static lift असलेल्या नळ योजना | रू. १९७० | रू. २५६१ | रु.२९५५ |
| ३) ३० मी. पर्यंत Static lift असलेल्या नळ योजना | रू. १५३० | रू. १९८९ | रु.२२९५ |